**प्रेसनोट** **दिनांक १८/०५/२०१९**

## येरवडा पोलीस स्टेशन,पुणे

### घरफोडी चोरीचे गुन्ह्यातील आरोपीस मा.न्यायालयाने शिक्षा सुनावली.

---

येरवडा पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अजय वाघमारे यांचे मार्गदर्शनाखाली येरवडा पो.स्टे.कडील पैरवी अधिकारी पो.उप.निरी.श्री.राजेंद्र कांबळे, कोर्ट कर्मचारी पो.हवा. ५७३८ राहूल शिंदे यांनी येरवडा पोलीस स्टेशन कडील (१) गुन्हा रजि.नं. २३२/२०१२ भा.दं.वि.क. ४५४,४५७,३८० कोर्ट केस नं. ३७८५/२०१२ (२) गुन्हा रजि.नं. १२१/२०१२ भा.दं.वि.क. ४५४,४५७ कोर्ट केस नं. ३७८६/१२ या गुन्ह्यांचे मा.न्यायालयीन सुनावणी दरम्यान, यातील साक्षीदार, पंच यांना योग्य ते संरक्षण दिले, त्यांना वेळचेवेळी मा.कोर्टात सुनावणीसाठी हजर ठेवले, त्यामुळे यातील साक्षीदार, पंचांनी सरकारी पक्षाचे बाजूने साक्ष दिल्याने यामधील आरोपी नामे- आकाश हेमराज परदेशी, वय २७ वर्षे, रा. साईबाबा मंदिराशेजारी, यशवंतनगर, येरवडा, पुणे यास मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. न्यायालय क्र. ५, पुणे यांनी दोन्ही गुन्ह्यात एक वर्ष सक्त मजूरी व ५०००/- रू. दंड दंड न भरल्यास १५ दिवसांची साधी कैद अशी शिक्षा सुनावलेली आहे.

अशा प्रकारे येरवडा पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अजय वाघमारे, पैरवी अधिकारी पो.उप.निरी.श्री.राजेंद्र कांबळे, कोर्ट कर्मचारी पो.हवा. ५७३८ राहूल शिंदे यांनी गुन्ह्याचे दोषसिध्दीचे कामी मा.न्यायालयीन प्रक्रिये दरम्यान उल्लेखनिय कामगिरी केली आहे

---